**BDC LIBRARY**
**New Paper Clipping**
**A.Y. 2023-2024**

# निरोगी जीवनासाठी हास्य गरजेचे : एस. पी. पाटील

**पाटण**, दि. ९ : समाजात स्पर्धा प्रचंड वाढली आहे. या स्पर्धेच्या युगात जगत असताना विविध प्रकारच्या ताणतणावातून प्रत्येकाला जावे लागते. त्यातून आजार निर्माण होत असतात. म्हणून निरोगी जीवनासाठी हास्य गरजेचे आहे. जीवनातील ताणतणाव टाळण्यासाठी खळखळून हसले पाहिजे, असे मत प्रा. डॉ. संतोष पाटील यांनी व्यक्त केले.

बिबी (सलतेवाडी), ता. पाटण येथे बाळासाहेब देसाई कॉलेजच्या विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या कार्यक्रमात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. यावेळी लेफ्टनंट प्रा. डॉ. संतोष पाटील, प्रा. व्ही. एस. माथणे, सलतेवाडीचे पोलीस पाटील संदीप सलते, कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. जी. एस. पट्टेबहादूर यांची उपस्थिती होती.




विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्रा. डॉ. एस. पी. पाटील. व्यासपीठावर मान्यवर. (श्रीगणेश गायकवाड)

प्रा. डॉ. संतोष पाटील म्हणाले, हास्य हा जीवनाचा अविभाज्य भाग आहे. प्रत्येक प्रसंगात विनोद लपलेला असतो. तो आपण शोधला पाहिजे, असे सांगून आपल्या काव्यमय विनोदी शैलीने विविध विनोदी चुटकुल्यांनी शिबिरातील विद्यार्थ्यांना खळखळून हसविले.

प्रा. विनायक माथणे यांनी श्रमसंस्कार शिबिरातून विद्यार्थ्यांना स्वच्छतेचे धडे मिळतात, ते त्यांनी आयुष्यभर जपले पाहिजेत असे सांगितले.

विशेष श्रमसंस्कार शिबिरात प्रा. डॉ. सौ. एम. आर. सपकाळ यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व विद्यार्थ्यांचे रक्तगट व हिमोग्लोबिन तपासणी शिबिर घेण्यात आले. यावेळी सूक्ष्मजीवशास्त्र विभागाच्यावतीने पथनाट्य सादर केले. प्रा. बळीराम लोहार यांनी प्रास्ताविक केले. प्रा. एल. जी. गणगे यांनी आभार मानले. कार्यक्रमास प्रा. सौ. एस. एस. डिगे, प्रा. कु. मोळावडे, प्रा. आर. के. शिर्के, प्रा. दिनेश रेवडे, प्रा. बी. जे. रासकर, प्रा. व्ही. एस. कांबळे, बिबी, मौजे सलतेवाडी गावचे ग्रामस्थ व विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होत्या.